# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १७/१०/२०२२ (सोमवार)**

**(दुपार)**

---

### घरफोडी

१) पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील गिरडकर ले आउट पोंगडे हॉस्पीटल जवळ उमरेड येथे दिनांक १५/१०/२२ चे २०.३० वा. ते दिनांक १६/१०/२२ चे ०७.१५ वा. सुमारास फिर्यादी नामे— राघोजी जोधे वय ४० वर्ष, रा.गिरडकर ले—आउट पोंगडे हॉस्पीटल जवळ उमरेड यांचे आर्या टायर्स नावाची दुकान उमरेड ते नागपुर रोडवर आहे. ते स्वताचा दुकान चालवितात. ते दुकानाच्या वरच्या मजल्यावर परिवारासह राहतात. दि.१५/१०/२२ रोजी रात्री ०८/०० वा.दुकान बंद केली तेव्हा दुकानाचे काऊंटर मध्ये १,५०,०००/—रू. ड्रॉपला लॉक करून ठेवलेले होते. दि.१६/१०/२२ ला सकाळी ०७.१५ वा. फिर्यादीचे घरी किरायाने राहणारे चंदु आस्वले यांनी फोन करून सांगितले की, दुकानाचे शटर उचललेले आहे. तेव्हा फिर्यादीने लगेच जावुन पाहीले असता दुकानाचे शटर उचललेले दिसले पण लॉक तुटलेले नव्हते. आत पाहीले असता दुकानाचे काऊंटरचे ड्रॉपचे लॉक तुटलेले दिसले व त्यामध्ये फिर्यादीने ठेवलेले १,५०,०००/—रू दिसले नाही. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने दुकानाचे शटर उचलुन दुकानाच्या काऊंटरचे लॉक तोडुन त्यामध्ये ठेवलेले १,५०,०००/—रू नगदी चोरून नेले. तसेच हर्षल धनीराम चौधरी रा. कावरापेठ उमरेड यांचे सुद्धा उमरेड ते नागपुर रोडवर अदिवक टायर्सची दुकान आहे. त्यांच्या दुकानाचे सुद्धा शटर उचललेले होते परंतु त्यांच्या दुकानातुन चोरी करण्याचा प्रयत्न केला होता पण चोरी झालेली नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८०, ५११ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि रविंद्र वाघ मो.नं. ९९७५८१८४०१ हे करीत आहे.

२) पो.स्टे. रामटेक :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील रामजी नगर परसोडा शितलवाडी येथे दिनांक १६/१०/२२ चे १४.०० वा. ते १४.१५ वा. सुमारास फिर्यादी नामे— अनिल परसराम डोंगरे वय २९ वर्ष रा. रामजीनगर परसोडा शितलवाडी हा आपल्या घराचा दरवाजाला कुलुप लावुन आपल्या डयुटीवर गेला होता. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने घराचा दरवाजाचा कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने घरातील लोंखडी कपाटाचे लॉकर मध्ये ठेवलेले सोन्या—चांदीचे दागिने किमत २४,२००/—रु. व नगदी ७००/—रु. असा एकुण २९,९००/—रु. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि /खोब्रागडे सा. पोस्टे रामटेक मो.न. ९८९०२२२८४९ हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपी अटक

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०६ कि.मी. अंतरावरील ईसापूर शिवार येथे दिनांक १६/१०/२०२२ चे १२.१० वा. ते ०३.३५ वा. दरम्यान एमएच— ४०/एल— ६१६ क्रमांकाचा ट्रैक्टर ट्रॉलीचा चालक आरोपी नामे— अनिल उर्फ गोलु अण्णाजी ढेपे वय २७ रा वार्ड क्र. ३ ईसापुर याने ईसापुर कन्हान नदीच्या पात्रातुन विना परवाना अवैधरित्या १ ब्रास रेती किं. ३,०००/— रू. भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण ३,७३,०००/—रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक राजु भोयर यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार उमेश ठाकरे मो नं. ९६२२७६४९९९ हे करीत आहे.

## निष्काळजीपणे मृत्यु

**पो.स्टे. देवलापार** :— अंतर्गत ०६ कि. मीं अंतरावरील मोजा सितापार येथे दिनांक १५/१०/२२ चे २०.०० वा. ते २०.३० वा. सुमारास आरोपी नामे— नंदकिशोर रामराव खोब्रागडे, वय ५२ वर्ष, रा.सितापार पवनी रामटेक याने आपले स्वताचा धानाचे शेतीत करंट लावल्याने कोणीही मरू शकतो याची जाणीव असतांना सुध्दा त्याने जानीवपुर्वक आपल्या शेतामध्ये धानाच्या बांधीला अवैधरित्या सेंट्रींग तारेचा करंट लावल्याने मनोहर मुंशीलाल वाढीवे (मृतक), वय २६ वर्षे रा कडबीखेंडा ता रामटेक याचे उजव्या पायाला करंट लागुन तो मरण पावला आहे.

सदर प्रकरणी नामे— मुंशीलाल समनलाल वाढीवे वय ५२ वर्षे रा.कडबीखेडा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम ३०४ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि लक्ष्मी घोडके मो.नं.८८३०६१४९५० या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**